# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## प्रजासत्ताक दिन

लोकमत

# राजगुरुनगरात सरकारी कार्यालयात ध्वजवंदन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** राजगुरुनगर शहरात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. मुख्य शासकीय कार्यालय, विद्यालये, महाविद्यालये, शाळांमध्ये पाहुण्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ध्वजवंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कवायत करुन सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

महात्मा गांधी विद्यालयाच्या मैदानात शासकीय ध्वजवंदन तहसीलदार सुचित्रा आमले यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शाळांचा विविधगुणदर्शनाचा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाप्रसंगी खेडच्या तहसीलदार सुचित्रा आमले, नायब तहसीलदार राजेश कानसकर, पोलीस निरीक्षक अरविंद चौधरी सहायक पोलीस निरीक्षक नीलेश बडाख, राजगुरुनगर नगर परिषदेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, खेड पंचायत समितीचे सभापती अंकुश राक्षे, खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरी सांडभोर, गणेश जोशी, उपाध्यक्ष अजित लुणावत, प्राचार्य सुनील जाधव, पांडुरंग होले यांच्यासह तालुक्यातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी हजेरी लावली.



७१व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या मैदानावर ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. या वेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेटनी संचलन केले.

विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर व समाजप्रबोधन करणारी नृत्य सादर केली. हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेटनी संचलन केले. हुतात्मा स्मारकामध्ये गटविकास अधिकारी अजय जोशी यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. राजगुरुनगर शहरातील मुख्य रस्त्याने लेझीम, घोषवाक्याच्या गजरात प्रभात फेरी काढण्यात आली. सकाळी १० वाजता हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांच्या वाड्यावर भीमाशंकर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश कौदरे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

या वेळी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख, स्मारक समितीचे माजी अध्यक्ष सुशील मांजरे, खेड तालुका भीमशक्तीचे अध्यक्ष विजय डोळस, शैलेश रावळ, संदीप वाळुंज सचिन भंडारी, नरेंद्र गायकवाड यांच्यासह नगर परिषदेचे नगरसेवक व राजगुरुनगर शहरातील नागरिक उपस्थित होते. शहरातही ध्वजवंदन झाले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Jan 28, 2020
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख